# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21 / 02 / 2024 (बुधवार) सकाळ

## फरार सराईत गुन्हेगार लतिफ अन्सारी याची न्यायालयापुढे शरणागती

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी नागपूर ग्रामीण येथे नियुक्त होताच जिल्हयामधील सराईत गुन्हेगारांचा आढावा घेतला होता. त्यानुसार त्यामध्ये अप क्र. ५२२/२० कलम ३०२, ३०७, १४१,१४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ४२७, १२०(ब) भादंवि. अन्वये पोस्टे खापरखेडा येथे दाखल असलेल्या गुन्हयातील **आरोपी नामे– लतीफ हफीज अन्सारी, वय ५० वर्ष, रा. वलनी** हा मागील ०४ वर्षापासुन फरार असलेला तसेच त्यापुर्वी वेगवेगळे १) अप क्र. ४६/१० कलम ३७९, ३४ भांदवि.,२) अप क्र. १०४/१० कलम ३०२, ३०७ ,३४ भांदवि. सहकलम ३, २५ भा. ह.का. ३) अप क्र. १४५/११ कलम ३७९, ३४ भादंवि ४) अप क्र. ०४/१३ कलम ३७९, १०९, ३४ भादंवि ५) अप क्र. ११२/१३ कलम ३७९, १०९, ५११ भादंवि ६) अप क्र. १२३/१४ कलम ३७९ भादंवि ७) अप क्र. ६४/१४ कलम ३०७, ३३२,३७९, ४२७, ३४, १२० (ब) भादंवि८) अप क्र. ८७/१४ कलम ३७९, ३५३, ५११,५०६, ३४ भादंवि ९) अप क्र. ९१/१४ कलम ३७९, ५११, ३४ भादंवि १०) अप क्र. २३/१६ कलम ३७९, ३४ भादंवि ११) अप क्र. १०९/१६ कलम ३७९, ३४ भादंवि १२) अप क्र. २३८/१६ कलम ३७९, १०९, ३४ भादंवि १३) अप क्र. ११४/१६ कलम ३७९, ३४ भादंवि सहकलम ३(१) म. को.का. नागपूर शहर १४) अप क्र. ४१/१९ कलम ३७९, १०९, ३४ भादंवि १५) अप क्र. ३४८/२१ कलम ३, ५, २५, २७ भा.ह.का. असे एकुण १५ गुन्हे दाखल असल्याचे पाहुन यांनी तात्काळ लतीफ हफीज अन्सारी याला अटक करण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांना सुचना दिल्या त्यानुसार नागपूर ग्रामीण पोलीसाची वेगवेगळे पथक तयार करून त्याचा शोध घेतला. परंतु सदर आरोपी वेगवेगळया राज्यामध्ये जावुन राहात असल्याने त्यास अटक करण्यात पोलीसांना यश प्राप्त होत नव्हते. यामुळे मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी सराईत गुन्हेगार लतीफ अन्सारी याच्या मुसक्या आवळण्याकरीता Crpc कलम ८२ व ८३ अन्वये कारवाई करण्याकरीता खापरखेडा पोलीस स्टेशनला सुचना दिले. यानुसार पोलीस स्टेशन खापरखेडा यांनी Crpc कलम ८२ अन्वये मा. कनिष्ठ न्यायालय सावनेर यांचेकडे अहवाल सादर केल्याने मा. न्यायालयाने सदर सराईत गुन्हेगार लतीफ अन्सारी याचेविरूद्ध Crpc कलम ८२ प्रमाणे दि. २५/०१/२०२४ रोजी फरारी घोषित केले. सदर आदेश त्याला तामिल करण्याकरीता पोलीसांनी गावामध्ये दवंडी देवून त्याच्या घरावर सदर मा. न्यायालय यांच्या आदेशाची प्रत चिटकवले. परंतु सदर आदेश तामिल न झाल्याने व आरोपी हजर न झाल्याने सराईत आरोपी विरूद्ध Crpc कलम ८३ अन्वये आरोपीची मालमत्ता जप्त करण्याबाबतचे मा. न्यायालयाकडुन आदेश प्राप्त करण्याचे हालचाली सुरू केल्या. सदर घटनेची आरोपीला माहिती प्राप्त झाल्याने तसेच आपण हजर न झाल्यास आपली मालमत्ता जप्त होईल यामुळे आरोपी आज दि. २१/०२/२०२४ रोजी मा. न्यायालया समोर हजर झाला व आरोपीस मा. न्यायालयाने पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन खापरखेडा यांच्या ताब्यात दिले.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर